# प्रेसनोट

नाशिक,
दि. १८/०२/२०२५

**आलोसे १) सुरेश कारभारी चौधरी, वनपाल कुशेगांव ता. इगतपुरी जिल्हा नाशिक २) शिरीष सजन निरभवणे, सहा. वनसंरक्षक, उप वनसंरक्षक कार्यालय, पश्चिम भाग, नाशिक यांनी १००००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | वाडीवऱ्हे पोलीस ठाणे गु.र.नं. ५३/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७अ व १२ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) सुरेश कारभारी चौधरी,वनपाल कुशेगांव ता. इगतपुरी जिल्हा नाशिक<br>२) शिरीष सजन निरभवणे, सहा. वनसंरक्षक, उप वनसंरक्षक कार्यालय, पश्चिम भाग, नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १००००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १००००/- रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांची आलोसे क्रमांक ०१ व ०२ यांनी लाकडाची भरलेली पिकअप गाडी मालासकट सोडुन देण्याची ऑर्डर करण्यासाठी आलोसे क्रमांक २ यांनी तक्रारदार यांना आरोपी क्रमांक ०१ यांना भेटण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे तक्रारदार आलोसे क्रमांक ०१ सुरेश कारभारी चौधरी, वनपाल कुशेगांव ता. इगतपुरी जिल्हा नाशिक यांना भेटण्यास गेला असता त्यांनी स्वत:साठी व आलोसे क्रमांक ०२ शिरीष सजन निरभवणे, सहा. वनसंरक्षक, उप वनसंरक्षक कार्यालय, पश्चिम भाग, नाशिक यांनी सांगीतल्याप्रमाणे तक्रारदार यांचे कडे १००००/- रू लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्रमांक ०१ सुरेश कारभारी चौधरी, वनपाल कुशेगांव ता. इगतपुरी जिल्हा नाशिक यांनी तक्रारदार यांचे कडे १००००/- रू लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.१८.२.२०२५ रोजी स्विकारली व आलोसे क्र २ शिरीष निरभवणे यांनी फोनव्दारे स्विकारलेल्या लाच रकमेस संमती दर्शवुन प्रोत्साहन दिले म्हणुन दोघांविरुध्द दि.१८.२.२०२५ रोजी वाडीवऱ्हे पोलीस ठाणे गु.र.नं. ५३/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७अ व १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.


संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००


( स्वप्निल राजपुत )
पोलीस निरीक्षक, (वाचक)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक